दिनांक : मंगळवार १७ मे, २०१६

**पालघर येथे १,५०० एकर क्षेत्रावर नवे शहर उभारणार**
**विखुरलेली सर्व शासकीय कार्यालये एकाच संकुलात आणणार**
**--एकनाथराव खडसे**

मुंबई दि.१७ मे : नवनिर्मित पालघर जिल्ह्यात जनतेशी संबंधित विखुरलेली राज्य शासनाची सर्व कार्यालये एकाच संकुलात आणण्याच्या दृष्टीने पालघर येथे राज्य शासनाच्या १,५०० एकर जमिनीवर नवे शहर उभारण्याचा राज्य शासनाचा विचार असून या दृष्टीने विचार विनिमय सुरु झाला आहे, अशी माहिती महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज येथे बोलताना दिली. या शहराचा आराखडा व डिझाईन राज्य शासनाच्या अखत्यारीतील सिडको किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तयार करावे, असा विचार आहे. याबाबत परिपूर्ण चर्चा झाल्यानंतरच निर्णय घेण्यात येणार असल्याचे खडसे यांनी सांगितले.

**प्रत्येक जिल्ह्यात गोसंरक्षण**

राज्यातील भाकड गायी व गोवंश यांचे संरक्षण करण्यासाठी राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात गोसंरक्षण केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती आज पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री एकनाथराव खडसे यांनी मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना दिली. खडसे पुढे म्हणाले की, अशा गोसंरक्षण केंद्राचे प्रारुप तयार करण्याचे काम शासकीय पातळीवर सुरु आहे. अशा प्रकारचे गोसंरक्षण केंद्र सुरु करण्यासाठी निविदा काढून पात्र ठरलेल्या स्वयंसेवी संस्थेला राज्य शासन गायरान जमीन देणार असून याठिकाणी ठेवण्यात येणाऱ्या जनावरांना चारा उपलब्ध व्हावा यासाठी वन जमिनीवर राखीव कुरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच अशा केंद्रांना कमी दराने पाणी पुरवठा करण्यात येणार असून जनावरांच्या आश्रयासाठी शेड बांधणे तसेच विहीर खोदणे यासाठी देखील राज्य शासन मदत करणार आहे. त्यासाठी येणार खर्च राज्य शासन उचलणार असल्याचे खडसे यावेळी म्हणाले.

**दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी**
**आतापर्यंत १०,६५३ कोटी रुपये खर्च झाले**

राज्यातील दुष्काळग्रस्त भागाला विविध स्वरुपाची मदत करण्यापोटी आतापर्यंत १०,६५३ कोटी रुपये खर्च झाले असून अशा प्रकारची मदत करण्याकरीता आणखी २००० कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत, असेही खडसे यांनी यावेळी सांगितले. खडसे पुढे म्हणाले की, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाने आतापर्यंत नापिकीसाठी २९२३ कोटी ३२ लाख रुपये, चारा छावण्या १०९ कोटी ८४ लाख रुपये, पाणीपुरवठा १४५ कोटी १२ लाख रुपये, अन्न सुरक्षा ५९७ कोटी १८ लाख रुपये, फि माफी, वीज बीलात तसेच जमिन महसूलात सूट यापोटी ५०६ कोटी १६ लाख रुपये याप्रमाणे मदत दिली आहे. याखेरीज, राज्यातील ६.५७ लाख शेतकऱ्यांकडील ४,२९३ कोटी ८६ लाख रुपये एवढ्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे.

*****